तात्काळ
कालमर्यादा

क्रमांक :- व्हीपीएम २००९/प्र.क्र.१९८/पंरा-३,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दुरध्वनी क्र.-२२८३९९२४/२२७९३००७
दिनांक :- ६७ऑगस्ट,२००९.

प्रति,
महासंचालक,
माहिती व जनसंपर्क संचालनालय,
मंत्रालय,मुंबई-३२.

विषय:- श्री.अण्णा हजारे यांच्या समवेत मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २८.०७.२००९ रोजी झालेल्या बैठकीमध्ये घेतलेल्या निर्णयावर कार्यवाही करणेबाबत.

संदर्भ:- सामान्य प्रशासन विभागाचे पत्र क्र.अहत १६०९/प्र.क्र.८१/०९ (भाग-२) /११-अ , दि.१८ जुलै,२००९.

महोदय,

श्री.अण्णा हजारे यांच्या समवेत मा.मुख्यमंत्री यांची दि.२८ जुलै,२००९ रोजी सहयाद्री अतिथीगृह येथे बैठक झाली. या बैठकीच्या कार्यवृत्तातील आपल्या संचालनालयाशी संबंधित मुद्दा खालील प्रमाणे आहे.

| बैठकीत उपस्थित केलेला मुद्दा | बैठकीत झालेला निर्णय |
|---|---|
| ग्रामसभेला जादा अधिकाराचा कायदा झाला मात्र लोकशिक्षण, लोकजागृती संबंधाने शासनाकडून झालेली नाही. | ग्रामसभा कामकाजाचा आढावा गट विकास अधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी घेण्याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असल्याची माहिती जनतेपर्यंत पोहोचली नसल्याने टि.व्ही.रेडियो यासारख्या प्रसार माध्यमातून व्यापक प्रसिध्दी देवून लोक जागृतीची व प्रबोधनाची जरुरी असल्याचे निदर्शनास आणले. याबाबत महासंचालक, माहिती व जनसंपर्क यांनी ज्याप्रमाणे माहिती अधिकाराविषयी लोकराज्य मासिकाद्वारे प्रबोधन करण्यात आले व यापुढेही करण्यात येईल, तसेच ग्रामसभेच्या अधिकाराबाबत प्रबोधनासाठी प्रसिध्दी देण्यात येईल, असे स्पष्ट केले. त्याचप्रमाणे यासाठी इतर प्रसार माध्यमांचाही येथोचित वापर करण्यात यावा. असेही ठरले. |

२. यास्तव याप्रकरणी आपण तात्काळ कार्यवाही करुन ग्रामसभेच्या अधिकाराबाबत संपूर्ण महाराष्ट्र राज्यात टि.व्ही., रेडीयो, लोकराज्य, वर्तमानपत्रे व अन्य प्रसिध्दी माध्यमातून प्रसिध्दी देण्याबाबत, योग्य ती कार्यवाही करावी. तसेच यासंदर्भात आपण आपल्या जिल्हा प्रसिध्दी अधिकारी यांनाही याप्रकरणी तात्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात याव्यात.

३. प्रस्तुत मुद्याच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीची माहिती मा.मुख्यसचिवांना सादर करावी. तसेच श्री.अण्णा हजारे यांना देखील यासंदर्भात आपणाकडून केलेल्या कार्यवाहीबाबत कळविण्यात यावे. तसेच आपण केलेल्या कार्यवाहीची माहिती मा. प्रधान सचिव (सेवा) सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन ११ अ) तसेच सचिव, ग्राम विकास (कार्यासन पंरा-३) यांना देखील तात्काळ कळविण्यात यावी.

आपला

06.08.08

(मा.ता.गोडबोले)
अवर सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत,

प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग यांना त्यांचे पत्र क्र. अहत १६०९/प्र.क्र.८१/०९ (भाग-२) /११-अ , दि.१८ जुलै,२००९ च्या संदर्भात माहितीसाठी अग्रेषित.